# अपना सहकारी बँक लि.

**(मल्टिस्टेट शेड्युल्ड बँक)**

मल्टिस्टेट नोंदणी क्र.DMSCS/CR/816/2013 दि.२९ एप्रिल २०१३.
नोंदणी क्रमांक :बी. ओ. एम. बी. एन. के. १०७ सन १९६८

**नोंदणी कार्यालय :** १०६ -ए,गोविंदजी केणी रोड, नायगांव, मुंबई -४०० ०१४.
**कॉर्पोरेट ऑफिस :** अपना बँक भवन, डॉ. एस.एस.राव रोड, परेल, मुंबई -४०० ०१२.
दूरध्वनी :२४१६४८६०/२४१०४८६१/२४१०४८६२/२४११४८६३ फॅक्स : २४१०४६८०
email :corporateoffice@apnabank.co.in website :www.apnabank.co.in

अपना बँक
अपना सहकारी बँक लि.
APNA SAHAKARI BANK LTD.
आपली माणसं... आपली बँक
Multi State Scheduled Bank

## : ५६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना :

**(फक्त सभासदांसाठी)**

अपना सहकारी बँक लि.च्या सर्व सभासदांना सूचना देण्यात येते की, बँकेची छप्पन्नावी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक २६ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता विसावा पार्क, मुंबई - गोवा हायवे, कल्लेगांव, पनवेल, जि.रायगडः ४१० २२१ येथे आयोजित करण्यात आली आहे.

**: कामकाजाची विषय सूची :**

१. दिनांक ११ सप्टेंबर २०२२ रोजी झालेल्या ५५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तांताचे वाचन करून कायम करणे.
२. अध्यक्षीय भाषण.
३. दिनांक ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या बँकेच्या ५६व्या वार्षिक अहवालातील वैधानिक लेखा परिक्षकांनी प्रमाणित केलेले नफा-तोटा पत्रक, ताळेबंद आणि संचालक मंडळाचा अहवाल स्वीकृत करणे.
४. सन २०२२-२३ च्या वैधानिक लेखा परिक्षकांच्या अहवालाची नोंद घेणे.
५. सन २०२१-२२ च्या वैधानिक लेखा परिक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालावर विचार करून स्वीकृत करणे.
६. सन २०२३-२४ करिता संचालक मंडळाने शिफारस केलेल्या व रिझर्व्ह बँकेने मान्यता दिलेल्या मे. एस.सी.मेहरा अँड असोसिएटस, एल.एल.पी., चार्टर्ड अकाऊंटंट, मुंबई यांची नेमणूक करण्यास व मानधन ठरविण्याचे अधिकार संचालक मंडळास देणे.
७. वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेली संशयित व बुडीत येणे बाकी संबंधित व्यक्तींकडून करावयाच्या वसुलीचे सर्व अधिकार अबाधित ठेऊन, निर्लेखित करण्यास कार्योत्तर मान्यता देणे.
८. पोटनियम दुरुस्तीस मान्यता देणे.
९. वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या रजेला पोटनियम 8(a)(ii) नुसार मान्यता देणे.
१०. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
सही/-
(राजन होंबाळकर)
मुख्य कार्यकारी अधिकारी

परेल, मुंबई - ४०० ०१२
दिनांक : ११/०९/२०२३

**सूचना :**

अ. गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास वरील सभा निश्चित केलेल्या जागीच सकाळी १०.३० वाजता घेण्यात येईल व पोटनियम क्र.२९ (iii) नुसार त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
ब. सभासदांना वार्षिक नफा-तोटा पत्रक, ताळेबंदाबाबत माहिती विचारावयाची असल्यास दि. १६ सप्टेंबर, २०२३ पासून २२ सप्टेंबर, २०२३-पर्यंत कार्यालयीन वेळेत कॉर्पोरेट ऑफिसशी संपर्क साधावा.
क. सन २०२२-२३ चा वार्षिक अहवाल सभासदांसाठी बँकेच्या वेबसाईटवर, नोंदणीकृत कार्यालय, कॉर्पोरेट ऑफिस व शाखांमध्ये दि. १२/०९/२०२३ पासून उपलब्ध आहे.
ड. सर्व सभासदांस सूचित करण्यात येते की, त्यांच्या पत्त्यातील बदल किंवा नवीन पत्ता बँकेच्या शेअर विभागाशी संपर्क साधून लवकरात लवकर कळवावा.